महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ❖ १९ जून २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक ३५१ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




# भाजपच्या 'मिशन मुंबई' ला सुरुवात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** भारतीय जनता पार्टीने देशाची आर्थिक राजधानी मुंबई महापालिका जिंकण्यासाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली विकासकामे घरोघरी पोहोचविण्यात येत आहेत. या महिन्यात भाजपाने 'घर घर चलो अभियान'च्या माध्यमातून मुंबई पिंजून काढण्याचा निर्धार केला आहे. मुंबईतील २२७ प्रभागांत भाजप सक्रिय झाला आहे. नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान पदाची ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात त्यांनी केलेली विकासकामे आणि राज्य सरकारची विकासकामे लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम मुंबई महापालिका निवडणुकीचा प्रचार म्हणून भाजपने विभागवार पदाधिकाऱ्यांच्या खांद्यावर दिले आहे. त्या दृष्टीने पक्षाच्या जिल्हावार बैठका झाल्या असून, या बैठकीत डॉक्टर, वकील, सीए, साहित्यिक, माजी सैनिक अशा विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या व्यक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत आहेत. कार्यकर्त्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विकासकामांविषयी माहिती देत आहेत, अशी माहिती पक्षाच्या सूत्रांनी दिली.


### घर घर चलो अभियान

भाजपने मुंबईत 'घर घर चलो अभियान' सुरू केले आहे. या अभियानातून भाजपने केंद्र आणि राज्यात केलेली विकासकामे शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू केले आहे. विविध विकास योजनांची आणि प्रकल्पांच्या माहिती पत्रकांचे वितरण आणि प्रचार, आतापर्यंत मंडळ स्तरावर सभा आणि बैठका घेऊन शहर आणि उपनगरांत भाजप सक्रिय झाला आहे.

> मुंबई महापालिका निवडणुकीची तयारी झाली आहे. जिल्हानिहाय, बूथनिहाय बांधणी सुरू आहे. सर्व नियोजन झाले आहे. आम्ही निवडणुकीसाठी तयार आहोत. – केशव उपाध्ये, प्रवक्ते भाजपा

> मोदी सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. राम मंदिर उभारले, तिहेरी तलाक, जनधन योजना, शेतकरी सन्मान योजना, रस्ते, पूल अशा विविध योजना आणि प्रकल्प पूर्ण केले आहेत. जनतेच्या हिताच्या योजना आम्ही घरोघरी पोहोचवित आहोत.
> – प्रभाकर शिंदे, माजी नगरसेवक, भाजपा

> राज्य आणि केंद्र सरकारच्या योजना लोकांपर्यंत आम्ही नेत आहोत. ही निवडणुकीची तयारी आहे. २२७ प्रभागांत आमचे काम सुरू आहे. नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. निवडणुकीसाठी आम्ही सज्ज आहोत.
> – रवि राजा, उपाध्यक्ष, भाजपा, मुंबई



### डिजिटल प्रचारावर भर

भाजपने मंडळ स्तरावर डिजिटल प्रचारावर भर दिला आहे. पालिका निवडणुकीच्या दृष्टीने अधिकाधिक प्रभावी प्रचार कसा होईल, सरकारने केलेली विकासकामे लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कोणते मंडळ किती प्रभावी काम करते, यासाठी स्पर्धाही होणार आहे. अधिक परिणामकारक प्रचारासाठी डिजिटल माध्यमांचा वापर केला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### एक पेड माँ के नाम

भाजपने ५ जूनपासून मुंबईत 'एक पेड माँ के नाम' हे भावनिक अभियान सुरू केले आहे. या माध्यमातून भाजपकडून वृक्षारोपण मोहीम राबवण्यात येत आहे. या अभियानाला स्थानिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पालिका निवडणुकीच्या प्रचाराची पावसाळ्याच्या दिवसांत या अभियानाच्या निमित्ताने ही संधी भाजपाने साधली आहे. प्रचारात 'विकास' प्रमुख मुद्दा मुंबईतील कोस्टल रोड, काँक्रीटचे रस्ते, गारगाई-पिंजाळ प्रकल्प, ब्रिमस्टोवॅड प्रकल्प, पुलांची कामे, समुद्राचे पाणी गोडे करण्याचा प्रकल्प आदी प्रकल्प आणि योजना भाजपच्या काळात पूर्ण केल्या आहेत. त्यातील काही योजना सुरू आहेत, असा दावा पक्षाने केला आहे. हेच पालिका निवडणुकीत प्रमुख मुद्दे प्रचाराचे राहतील, अशी माहिती पक्षाच्या सूत्रांनी दिली.

# भातसा नदीवरील गेरसे पुल धोकादायक

## तातडीने उपाययोजना होण्याची मनसेची मागणी!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण :** वासिंद शहरातील कल्याण व शहापूर या दोन तालुक्यांना जोडणारा गेरसे वासिंद रस्त्यावरील भातसा नदीवर असलेला जुना गेरसे पूल सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असून या पुलावरील संरक्षण कठडे अनेक ठिकाणी तुटलेले असून, पावसाळ्यात रस्ता ओला आणि निसरडा होत असल्यामुळे अपघाताची शक्यता प्रचंड वाढली आहे.

सदर पुलाखालून भातसा नदीचे खोल पात्र असून, विशेषतः पावसाळ्यात ही नदी उग्र स्वरूप धारण करते. यां पुलाने असे अनेक भयावह पूर झेलले आहेत.अशा वेळी पुलाची विद्यमान अवस्था अपघातांना आमंत्रण देणारी ठरते. सध्या या पुलावरून नागरिक, विद्यार्थी, दुचाकीस्वार, वाहतूक रिक्षा तसेच वृद्ध व्यक्तींना या पुलावरून जाताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



नुकतीच पुणे येथे पावसाळ्यात झालेली इंद्रायणी नदीवरील पूल दुर्घटना आपण सर्वांनी अनुभवली आहे,जिथे दुर्लक्षित रचना आणि अपुरी देखभाल यामुळे निष्पाप नागरिकांचे प्राण गेले. अशीच भीषण घटना गेरसे पुलावर घडण्याआधी संबंधित विभागाने सजग होणे आवश्यक आहे.त्यामुळे प्रशासनाने लागलीच उपाययोजना करावी अशी मागणी वासिंद मनसेचे शहर प्रमुख अमोल बोराडे आणि पदाधिकाऱ्यांनी केली आहे या मागणीची लागलीच दखल घेऊन उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक एक यांनी तातडीने या पुलाची पाहणी केली. यावेळी मनसे पदाधिकारी यांनी जुन्या आणि कमकुवत पुलावरून ट्रक व अन्य अवजड वाहने जात असल्याने त्याची झीज झपाट्याने होत आहे. या पुलावरून मोठी वाहने जसे मोठ-मोठे कंटेनर माल भरभरून वाहतूक करीत असतात त्यामुळे सदर पुलाचे आयुष्य कमी होत आहे. या पुलावरून अवजड वाहतूक बंद करावी तसेच पुलाचे संरक्षण कठडे तातडीने दुरुस्त करावेत.

आजूबाजूला संरक्षण कठडे असून नसल्यासारखेच आहेत कारण ते अनेक ठिकाणी पूर्णपणे तुटले आहेत ते नसल्यामुळे पावसाळ्यात वाहन किंवा व्यक्ती पुलावरून खाली पडण्याचा धोका वाढला आहे.आणि मंजूर नवीन पुलाच्या बांधकामास लवकरात लवकर सुरुवात करावी.

ही फाईल अनेक महिने प्रलंबित असल्याचे दिसते. स्थानिक लोकांच्या जीविताला प्राधान्य देऊन नवीन पुलाचे काम लवकरात लवकर सुरू करावे.जर या गोष्टींकडे दुर्लक्ष झाले, तर भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास याची संपूर्ण जबाबदारी ही सार्वजनिक बांधकाम विभागावर राहील.आम्ही ही मागणी एक सामूहिक जनतेच्या वतीने करत आहोत.

आपल्या विभागाने सदर बाब गांभीर्याने घेत त्वरीत पावले उचलावीत ही विनंती केली असून यावेळी शहर अध्यक्ष अमोल बोराडे, शहर सचिव कल्पेश शेलार,शहर उपाध्यक्ष चेतन भोसले,उन्मेश साळुंखे आदी पदाधिकारी उपस्थित होते

## थोडक्यात महत्वाचे

# अबिटघर ग्रामपंचायत वतीने आदर्श शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कार देण्याचा निर्णय!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण :** आबिटघर या ग्रामपंचायत वतीने यंदा पासून ग्रामपंचायत हद्दीतील असलेल्या शाळा व शिक्षण अध्यापन कार्य पाहून येथील आदर्श शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कार देण्याचा निर्णय घेऊन याबाबत घोषणा करण्यात आली आहे.

अबिटघर ग्रामपंचायत सरपंच साक्षी संतोष साठे या आपल्या ग्रामपंचायत क्षेत्रात नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून विविध संकल्पना आखित आहेत. त्यांनी आपल्या ग्रामपंचायत हद्दीतील शाळांमधून आदर्श शिक्षक व आदर्श शाळा अशा दोन पुरस्कारांची शैक्षणिक वर्ष सन 2025-26 पासून घोषणा केली. विद्यार्थ्यांना अध्ययन व याअध्यापन शैक्षणिक कार्य बरोबर इतर कौशल्यपूर्ण उपक्रम राबवून शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक मूल्ये रुजवून तसेच शिक्षकांचे मनोबल वाढवून त्यांच्यात निकोप स्पर्धा वाढून शिक्षणाचा दर्जा वाढावा तसेच शाळांचा सन्मान जोपासण्यासाठी रोख रक्कम, सन्मानचिन्ह व मानपत्र असे स्वरूप असलेल्या "ग्रामपंचायत आदर्श शिक्षक व ग्रामपंचायत आदर्श शाळा" या दोन पुरस्कारांची घोषणा सरपंच साक्षी साठे यांनी केलेल्या आयोजित सभेत केली.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीध्यक्ष भरत जाधव, ग्रामपंचायत सदस्य धनश्री पाटील, केंद्रप्रमुख गुणवंत कांबळे, मुख्याध्यापक गणेश पवार, वासुदेव दयात, मनोज सूर्यवंशी, संतोष जाधव, मुख्याध्यापिका घोरपडे व सहशिक्षक उपस्थित होते. या आयोजित सभेचे सुत्रसंचालन व आभार शिक्षक रवींद्र रिंजड यांनी केले.

# कसारा-वाशाळा चौफुली रस्त्याच्या कामाला सुरुवात



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /**कसारा:** मुंबई नाशिक महामार्गवरील कसारा वाशाळा चौफुलीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व संबधीत कंपनीने केलेल्या निकृष्ठ व अपघातास आमंत्रण ठरणाऱ्या चौफुलीवरील कामाविरोधात शिवसेना शाखा कसाराच्या वतीने आंदोलनाचा इशारा दिला होता. अखेर याची दखल घेत रस्ता दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली आहे. भारतीय राजमार्ग राष्ट्रीय प्राधिकरण प्रशासन व ठेकेदार कंपनीने आंदोलनाच्या इशाऱ्याचा धसका घेत नरमाईची भूमिका घेऊन 16 जून 2025 रोजी वाशाळा-कसारा धोकादायक रस्ता सुस्थितीत करण्याच्या कामाला सुरुवात केली. याबाबत महामार्ग प्रशासनाने ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करीत आपल्या मागणीनुसार व म्हणण्याप्रमाणे काम करण्यात येईल. अशी ग्वाही दिल्याने शिवसेना ठाकरे गटाने काम पूर्ण होईपर्यंत आंदोलन मागे घेतले आहे. याप्रकरणी खासदार सुरेश उर्फ बाळयामामा म्हात्रे यांनी देखील शिवसेनेच्या आंदोलनाच्या ईशाऱ्या ची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सिगल इन्फ्रा ठेकेदार कंपनी च्या अधिकाऱ्यांना फैलावर घेत चौफुली वरील त्रुटी सुधारण्यासाठी आदेश दिले होते.

## कर्तव्यदक्ष अधिकारी

# साहेबराव खरे यांच्यामुळे वनसंपत्तीच्या लयलुटीला चाप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** वनपाल व वन अधिकारी यांची कर्तव्य वनविभागाचे नियम, कायदे यांचा लोकांना वर्षांनुवर्षे विसर पडला होता, त्यामुळे गेली ३० ते ४० वर्षापासून वनसंपत्तीची अविरत पणे लय लूट सुरु होती. वनविभागाचा दबाव समाजकंटकावर राहिला नव्हता त्यामुळे संरक्षित वनांमधून मोक्या प्रमाणावर वृक्षतोडीचा सपाटा काही लोकांनी वर्षानुवर्ष सुरू ठेवला होता. परंतु मुरबाड वनपरिक्षेत्र विभाग पश्चिम यांच्या आस्थापनेवर व वन परिमंडल किशोर येथे प्रथमच वन परिमंडल अधिकारी साहेबराव खरे यांच्या रूपाने कर्तव्यदक्ष अधिकारी लाभल्याने पर्यावरण वृक्षप्रेमी नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. कुठल्याही प्रकारे वनविभागाची परवानगी न घेता काही ठिकाणी नवीन शर्तीच्या जागी वीटभट्टी सुरू करणे, नदीच्या पात्रात विनापरवानगी उत्खनन करणे, नवीन शेतीच्या जागी दगडाच्या खदानी सुरू करणे, वनविभागाच्या पडीक जागेत भाजीपाला लागवड करून आपला हक्क सांगणे अशा अनेक प्रकारचे अवैध धंदे किशोर परिमंडळ विभागात राजरोसपणे वर्षानुवर्ष सुरू होते. काही ठिकाणी लाकूड कारागीर यांनी घरातच आपले कारखाने सुरू केले होते हम करे सो कायदा या भूमिकेने जंगलाची तस्करी व पर्यावरणाचा न्हास व संरक्षित वनाची अपरिमित हानी सुरू होती. वन पल साहेबराव खरे यांनी गेल्या काही महिन्यापासून अप्रतिम कामगिरी करून या सर्व अवैध धंद्यांना आला घालायला सुरुवात केली आहे. त्यातील बहुसंख्या नागरिकांना पोलीस खात्याबरोबरच वनविभागाचे कायदे आणि नियम तितकेच कठोर आहेत. याची जाणीव प्रथमच साहेबराव खरे यांच्यामुळे झाली, यामुळे सर्व परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे. वनाअधिकारी एखाद्या पोलीस अधिकारी सारखा तत्पर असू शकतो. कर्तव्यनिष्ठ व ॲक्शन मोड मधील अधिकारी प्रथमच मुरबाड तालुक्यात लाभल्याने निश्चितच वनसंपत्तीची जतन व वाढ होण्यास मदत होणार आहे. असे नागरिकांची प्रतिक्रिया ऐकावयास मिळत आहे. असोले येथील संरक्षित वनामध्ये काही दिवसापूर्वी साहेबराव खरे यांच्या नेतृत्वाखाली सागवान लाकडांची तस्करी पकडण्यात वनविभागाला यश आले होते. जवळजवळ ५० हजारांचा मुद्देमाल साहेबराव खरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पकडला होता. त्याबाबत त्यांचे तालुक्यातून कौतुकही झाले होते. याचाच अर्थ असा की यापूर्वी संरक्षित वनांची तस्करी मोठ्या प्रमाणावर सुरू होती. काही जंगल कॉन्ट्रॅक्टर यांची मुजोरी ही वर्षानुवर्षे वाढली होती, नवीन शर्तीच्या जागेवरील वृक्षांची अविरत कत्तल सुरू होती. त्यामुळे गेल्या काही वर्षात जंगलांचे एकूण क्षेत्रफळ वरील प्रमाण मोठ्या प्रमाणावर सातत्याने घसरल्याचे दिसून येत होते. अवैध प्रकारांना आळा घालण्याबरोबर किशोर परिमंडळ परिसरात खरे यांनी वृक्ष व पर्यावरण जनजागृतीच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम व जनजागृतीची चळवळ जोमाने सुरू ठेवली आहे. वन्येजीव सप्ताह या उपक्रमातून या निमित्ताने विद्यार्थ्यांना वने व पर्यावरणाचे महत्त्व कळावे म्हणून शाळा कॉलेजमध्ये चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित करणे त्याचबरोबर गावोगावी प्रबोधनात्मक शिबिरांचे आयोजन करणे अशा प्रकारचे उपक्रम साहेबराव खरे नेहमीच राबवत असून लोकांना पर्यावरण व जंगलाचे महत्त्व पटवून देण्याची त्यांची तळमळ निश्चितच प्रशंसनीय आहे.









# गीतासार




**अध्याय १३**
**क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः**

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः नावाचा हा तेरावा अध्याय समाप्त झाला. ॥ १३ ॥

# आरोग्य
## केस गळती वाढली हे उपाय करा



पावसाळा ऋतू थंडावा आणि आराम आणतो, तर दुसरीकडे तो केसांसाठी अनेक समस्या देखील घेऊन येतो. या ऋतूत केस गळणे ही एक सामान्य समस्या बनू शकते, जी सहसा आर्द्रता, बुरशीजन्य संसर्ग आणि पोषणाच्या कमतरतेमुळे होते. तथापि, काही घरगुती केसांच्या उपचारांनी तुम्ही या समस्या टाळू शकता. येथे 3 प्रभावी घरगुती उपाय आहेत, ज्यांचा अवलंब करून तुम्ही पावसाळ्यात केस गळणे कमी करू शकता आणि त्यांना निरोगी ठेवू शकता.

**पावसाळ्यात केसांची काळजी घेणे का महत्वाचे आहे?**

पावसाळ्यात जास्त ओलावा आणि घाणीमुळे केस कमकुवत होतात आणि सहज तुटू लागतात. यावेळी बुरशीजन्य संसर्ग आणि केस गळती वाढू शकते. पावसाळ्यातील घाण केसांना देखील नुकसान करते. म्हणूनच, पावसाळ्यात केसांची चांगली काळजी घेणे खूप महत्वाचे आहे जेणेकरून केस निरोगी, मजबूत आणि सुंदर राहतील. योग्य काळजी घेतल्यास केसांच्या अनेक समस्यांवर मात करता येते.

**नारळ तेल आणि लिंबू केसांचा मास्क**

नारळाचे तेल केसांसाठी खूप फायदेशीर आहे कारण ते केसांना खोलवर पोषण देते आणि त्यांना मजबूत बनवते. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी असते, जे केसांना चमकदार आणि निरोगी बनवण्यास मदत करते, ज्यामुळे केस गळणे थांबते. कसे बनवायचे: नारळाचे तेल आणि लिंबाचा रस चांगले मिसळून हेअर मास्क तयार करा. तो केसांना लावा आणि 30 मिनिटे तसेच राहू द्या. त्यानंतर सौम्य शाम्पूने केस धुवा.

**आवळा आणि शिकाकाई हेअर मास्क**

आवळा आणि शिकाकाई दोन्ही केसांसाठी खूप फायदेशीर आहेत. आवळा व्हिटॅमिन सी ने समृद्ध आहे, जे केसांना मजबूत करते, तर शिकाकाई केसांना स्वच्छ आणि चमकदार बनविण्यास मदत करते. हा हेअर मास्क केसांना नैसर्गिकरित्या स्वच्छ करतो. कसे बनवायचे: आवळा पावडर आणि शिकाकाई पावडर पाण्यात मिसळून पेस्ट बनवा. ही पेस्ट तुमच्या केसांना पूर्णपणे लावा आणि 30 ते 45 मिनिटे तसेच राहू द्या. नंतर सौम्य शाम्पूने केस धुवा.

# मानाच्या पालख्या, वारकरी अन भाविकांच्या वाहनांना पथकरातून सूट

पंढरपूर येथील आषाढी वारी ही महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाची आणि जुनी परंपरा आहे. ही वारी महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असून विठ्ठल भक्तांसाठी खूप पवित्र मानली जाते. आषाढ शुद्ध एकादशीला (आषाढी एकादशी) पंढरपूर येथे ही वारी भरते. या दिवशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आणि परराज्यातून लाखो वारकरी पायी चालत पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी येतात. पांडुरंगाच्या भेटीची आस घेवून वारकरी अनेक मैल पायी चालतात.

महाराष्ट्रातील विविध संतांच्या पालख्या (दिंड्या) त्यांच्या मूळ गावांपासून पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या पालख्यांसोबत हजारो वारकरी विठ्ठलाचा गजर करत, भजन-कीर्तन करत चालतात. आषाढी वारी ही केवळ एक धार्मिक यात्रा नसून, ती महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक एकजुटीचे प्रतीक आहे. या वारीतून समानता, भक्ती आणि शांततेचा संदेश दिला जातो. जाती-धर्माचे भेद विसरून सर्व वारकरी एकत्र येतात. पंढरपूरची आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या भक्ती परंपरेचा एक महत्त्वाचा भाग असून लाखो वारकऱ्यांसाठी एक आध्यात्मिक अनुभव आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक आहे.

आगामी सन 2025 च्या आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या तसेच भाविकांच्या व वारकऱ्यांसाठीच्या सोयी-सुविधा, त्यांच्या वाहनांना पथकरातून सूट देणे, तसेच वारी मार्गावरील रस्ते दुरुस्ती या विषयाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दि.28 मे 2025 रोजी बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा होऊन मुख्यमंत्री महोदयांनी विविध विभागांना त्या अनुषंगाने सूचना व निर्देश दिले आहेत, त्यास अनुसरुन सर्व संबंधितांना सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे पुढीलप्रमाणे सूचना करण्यात आल्या आहेत. यानुषंगाने शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२५०६१६१८३१२४५११८ असा आहे.

1. पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या, भाविक व वारकऱ्यांना "आषाढी एकादशी 2025", गाडी क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर नमूद करुन आवश्यक त्या संख्येनुसार स्टीकर्स परिवहन विभाग, वाहतूक पोलीस पोलीस, संबंधित आर.टी.ओ. यांच्याशी समन्वय साधून पोलीस स्टेशन्स, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. ऑफिसेस मध्ये उपलब्ध करुन द्यावेत.

पंढरपूरला जातेवेळी व परत पंढरपूरहून येतेवेळी दि.18 जून 2025 ते दि.10 जुलै 2025 या कालावधीत ही सवलत पालख्या, भाविक व वारकऱ्यांच्या हलक्या व जड वाहनांसाठीच असेल, अशा सूचना दिल्या आहेत. तसे स्टीकर्स/ पास वर नमूद करण्यात यावे. हे पास परतीच्या प्रवासाकरिता ग्राह्य धरण्यात येतील याप्रमाणे स्टीकर्स तयार करण्यात यावेत. (नमूना सोबत जोडला आहे.) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सर्व पोलीस अधिकाऱ्यांना गृह विभागामार्फत अवगत करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

2. सर्व पथकर नाक्यावर स्वतंत्र पोलीस यंत्रणा ठेवावी. तसेच परिवहन विभागास देखील जादा बसेस गाड्या सोडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टीकोनातून HSP (Highway Security Patrolling) मार्फत पथकर नाक्यांजवळ पोलिसांची व्यवस्था करावी, सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (MSRDC), डेल्टा/ MSSC (Maharashtra State Security Council) फोर्स जास्त संख्येने तैनात करण्याचेही निर्देश दिले आहेत.

3. आपत्कालीन स्थितीचा सामना करण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तसेच राज्यातील इतर सर्व संबंधित रस्ते / महामार्गावर रुग्णवाहिका व क्रेनची व्यवस्था करण्यात यावी. मुंबई-कोल्हापूर-बंगलोर, पुणे-सोलापूर, इ. राष्ट्रीय मार्गावर सुद्धा क्रेनची व्यवस्था करण्याचे निर्देश MSRDC: NHAI, PWD च्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना त्वरीत कळविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

4. तसेच गरज पडल्यास सुरक्षित व सुरळीत वाहतुकीसाठी जड वाहनास आवश्यक असल्यास बंदी घालण्याबाबत परिवहन विभागाने योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

5. राज्यभरातून पंढरपूरला जाणारे रस्ते (उदा. मुंबईमधील सायन ते पनवेल महामार्ग, मुंबई-पुणे दुतगती मार्ग, मुंबई-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग, पुणे-सोलापूर, पुणे-सातारा-कोल्हापूर ते राज्य सीमेपर्यंतचा महामार्ग, इ. महामार्ग तसेच मुंबई-पुणे-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग व मुंबई-पुणे-सोलापूर राष्ट्रीय मार्गाला जोडणारे नवीन राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण रस्ते, इ.) या सर्वांचे खड्डे भरणे, दुरुस्ती कामे, सूचना फलके लावणे इत्यादी कार्यवाही त्या त्या कार्यान्वयीन यंत्रणांनी (सा.वा. विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग, NHAI, इ.) करावीत.

6. या कालावधीत रस्ता सुस्थितीत आणण्याची कामे राष्ट्रीय महामार्ग विभाग व NHAI ने तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले आहेत.

7. दर 20-25 कि.मी. अंतरावर पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग, इ. यंत्रणांनी संयुक्तिक रुग्णवाहीका, रस्ते खड्डे भरण्यासंबंधी मटेरीअल, केन, इ. व्यवस्था ठेवावी. तसेच बऱ्याच महामार्गावर रस्ते सुधारण्याचे काम प्रगतीपथावर आहेत, अशा कामांवर वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधित महामार्ग प्राधिकाऱ्यांनी आवश्यक ती उपाययोजना करावी.

8. महाराष्ट्र राज्यातून पंढरपूरकडे येणारे सर्व पथकर नाक्यांवर या कालावधीत पथकर माफी नसलेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना पथकरातून सूट द्यावी, असे ठरले व राज्य परिवहन (S.T.) विभागाच्या अधिकाऱ्यांनी गरजेप्रमाणे संबंधीत पोलीस ठाणे, इ. कडे या अनुषंगाने कूपन / पास प्राप्त करुन घ्यावेत.

राज्यभरातून पंढरपूरला जाणारे भाविक, वारकरी तसेच पालख्यांच्या वाहनांना संबंधित जिल्ह्यातील व शहरातील सर्व पोलीस ठाणे व वाहतुक विभाग/ शाखा/ चौकी येथून भाविकांचे मागणीप्रमाणे पथकर माफ (टोल फ्री) पासचे वाटप करण्यात यावे.

9. ग्रामीण पोलीस / आर.टी.ओ. यांच्यामार्फत दिले जाणारे कुपन्स / पावती यांची संख्या बाबतीत एकत्रित माहिती संबंधित महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास / सा. बां. विभागास/ NHAI कार्यालये यांना माहितीकरीता सादर करावी. जेणेकरून भाविक व वारकरी वाहनांना पथकरातून सवलत दिल्यानंतर संबंधित उद्योजकांना State Budget मधून नुकसान भरपाई देण्यात येईल.

10. नाक्यांवर वाहतूक कोंडी होवू नये यासाठी जास्तीत जास्त मनुष्यबळ, ट्रॅफिक वार्डन व हॅंड होल्डिंग मशीन ठेवण्यात यावेत, ज्यामुळे या कालावधीत पथकर नाक्यांवर वाहतूक कोंडी होणार नाही. याबाबत सर्व संबंधित महामार्ग प्राधिकारी, पथकर कंत्राटदार यांनी कार्यवाही करावी.

11. पथकर कंत्राटदारांनी संबंधीत रस्त्याच्या क्षेत्रात / परिसरात वाहतूक पोलिसांसाठी आषाढी एकादशीच्या काळात जादाचे ट्रॅफिक वॉर्डन डेल्टा किंवा एम.एस. एस. फोर्स उपलब्ध करुन द्यावेत.

12. पोलीस व परिवहन विभागाने आषाढी एकादशीच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती जनतेस होण्याकरिता आवश्यकतेप्रमाणे अधिसूचना/ जाहीर प्रसिध्दी करावी.


लेखक
मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे


# सावरोली येथील तानसा नदीवरील पुलाला तडे

## अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी केली पाहणी !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण :** वासिंद -कांबारे या प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यावर असलेल्या सावरोली गावा जवळील तानसा नदीवरील पुलाला तडे गेलेले आहेत. सदर या पडलेल्या तडे याबाबत काल सायंकाळी ( 16 जून रोजी) येथील ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम माहिती विभागाला दिल्याने शहापूर उप अभियंता बळवंत कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा अभियंता एस.आर.अहिरे यांनी आपल्या कर्मचारी यांच्यासह तात्काळ भेट देत येथील पुलावरून होणारी वाहतूक थांबवून उपाययोजना संदर्भात वरिष्ठांना माहिती दिली. सदर याबाबत माहिती मिळताच सां.बा. विभाग अधिक्षक अभियंता सिध्दार्थ तांबे व कार्यकारी अभियंता एस.एम. कांबळे यांनी याठिकाणी (आज दि.17 जून रोजी) भेट देऊन पुलाची पाहणी केली. सध्या पावसाळा सुरू असल्याने या पुलाला पडलेल्या तड्यामुळे रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाहन चालक, प्रवाशी व स्थानिक नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून याबाबत योग्य ती उपाय योजना त्वरित करावी अशी मागणी होत आहे. वासिंद- कांबारे हा प्रमुख जिल्हा मार्ग (प्रजिमा) असून या रस्त्यावरुन वाडा, पालघर व गुजरात मार्गे तर शहापूर, भिवंडी व ठाणे दिशेने सततची वाहतूक सुरू असते. तसेच या रस्त्यालगत अनेक गांव पाडे जोडलेले आहेत. वासिंद पासून चौदा ते पंधरा किलोमीटर अंतरावर असलेल्या या रस्त्यावर सावरोली या गावाजवळ तानसा नदीवर असलेल्या पुलाला तडे पडलेले असल्याचे निर्दशनास येताच सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ संदीप पाटील यांनी याबाबत माहिती दिली.





साधारण या पुलाचे बांधकाम तीस ते बत्तीस वर्षांपूर्वी झालेले आहे. सध्या या रस्त्यावरून अनेक वाहनांची वाहतूक वर्दळ सुरू असते. तर त्यातच सध्या ऐन पावसाळा सुरू असल्याने पुलावर तडे पडलेल्या प्रकारामुळे ये-जा करणाऱ्या वाहन चालक, प्रवाशी व स्थानिक नागरिकांमधून भिती व्यक्त केली जात आहे.

तर सदरच्या पुलाची पाणी करण्यात आली असून येथील स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार असून या रस्त्यावरील जड वाहतूक बंद करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंता एस.एम.कांबळे यांनी सांगितले.

दरम्यान, मागील काळात महाड येथील सावित्री नदीवरील पुल वाहून गेल्याची घडलेली घटना व परवा पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमळा या पर्यटन स्थळावर इंद्रायणी नदीवरील लोखंडी (साकाव) पूल पडल्याची घडलेली घटना पहाता यामुळे येथे नव्याने पुल बांधकाम होणे आवश्यक असल्याची मागणी नागरिक व प्रवाशी वाहनचालकांनी केली आहे.

# ऋतुजा अनंता पवार झाली एम.बी.बी.एस. डॉक्टर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**मुरबाड :** कु.ऋतुजा अनंता पवार हिने नुकतेच वैद्यकीय क्षेत्रातील मानाची असणारी एम.बी.बी.एस ही पदवी उत्तीर्ण झाली आहे. ऋतुजा मुरबाड तालुक्यातील माल्हेड गावची कन्या असून मा.आमदार गोटिराम पवार यांची नात आहे. वैद्यकीय क्षेत्रासाठी आवश्यक असणारी नीट परिक्षेत तिला चांगले गुणांकन मिळाले असल्याने तिचा पालघर येथील वेदांत मेडिकल कॉलेज येथे सरकारी कोट्यातून फ्री शिप मध्ये प्रवेश मिळाला होता. ऋतुजाची आई प्राथमिक शिक्षिका आहे तर वडिल अनंता पवार हे सामाजिक कार्यकर्ते आहेत.

ऋतुजाने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे व आई वडिलांचे सर्वत्र कौतुक होत आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न होते ते पुर्ण झाले पुढे जाऊन आपण गोर गरीब रूग्णांची सेवा करणार असल्याचे डॉ.ऋतुजा पवार हिने सांगितले.

# कांबा ग्रामपंचायतीची 'माझी वसुंधरा' अभियान विषयी कौतुकास्पद कामगिरी

## कचरापेटी आणि छापील पिशव्यांचे घरोघरी जाऊन वाटप!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील औद्योगिक तसेच महत्त्वाची ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या कांबा ग्रामपंचायतीने'माझी वसुंधरा अभियान बाबतीत नागरिकांनमध्ये जनजागृती तसेच प्रत्यक्ष कृती होण्यासाठी ओला व सुका कचरा यासाठी डसबीन तसेच छापील पिशव्यांचे वाटप घरोघरी जाऊन कर्मचारी करत आहेत. या उपक्रमाचे सर्वांकडून कौतुक होत आहे.

विविध शासकीय योजना, उपक्रम, अभियान राबविण्यात कल्याण पंचायत समिती नेहमीच आघाडीवर असते, याच पंचायत समिती अंतर्गत कांबा ग्रामपंचायत देखील अशीच अग्रेसर असते, माझी वसुंधरा अभियान हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे पर्यावरण संवर्धन अभिमान आहे. हे अभियान राज्याच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाने सुरू केले आहे.'पंचमहाभूते,



भूमी(पृथ्वी)वायू(हवा)जल(पाणी)अग्नी(उर्जा) आणि आकाश या पाच तत्वावर आधारित आहे. याचे मुख्य उद्दिष्ट, पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे, नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे व शाश्वत विकासाला प्रोत्साहन देणे, हे आहे,

यासाठी कांबा ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत हद्दीत प्लास्टिक बंदी व्हावी, लोकांनी प्लास्टिकच्या पिशव्याचा वापर टाळावा, यासाठी सुमारे साडेचार ते पाच हजार कापडी पिशव्या तसेच तेवढेच ओला व सुक्या कच-यासाठी डसबीन घरोघरी जाऊन वाटप केले, पिशव्यांवर ग्रामपंचायत कांबा, स्वच्छ भारत अभियान, माझी वसुंधरा लोगो, प्लास्टिक दूर करुया, पर्यावरण वाचवूया, असा मजकूर लिहून जनजागृती, अभियान प्रचार, प्रसार, करण्याचे काम केले आहे.

विशेष म्हणजे पावसाळा सुरू असल्याने या पिशव्या व डसबीन बरोबर मेडिक्लोअर चे देखील वाटप करण्यात आले. यासाठी सरपंच हरिदास सवार, उपसरपंच दत्ता भोईर, सदस्या सोनाली उबाळे, पद्माकर शिरोसे, सुगंधा पावशे, वंदना पावशे, उषा गांवडे, छाया बनकरी, अरुण शिरोसे, ईशा भोईर, संदिप पावशे, संतोष पावशे,ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती सुंनदा पाटील, व ग्रामपंचायत कर्मचारी इत्यादी सर्वांनी पुढाकार घेऊन हे कौतुकास्पद काम केले आहे, याबाबत ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती पाटील म्हणाल्या, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे सर, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रकल्प संचालक श्रीमती छायादेवी शिसोदे मॅडम,उपमुख्य कार्यकारी अधिकारी(साप्र) अविनाश फडतरे, ग्रामपंचायत डेप्युटी सीईओ प्रमोद काळे, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, सहाय्यक बिडिओ रघुनाथ गवारी, तसेच विस्तार अधिकारी या सर्वांच्या सुचनेनुसार आणि ग्रामस्थांच्या मदतीने हे शक्य झाले आहे.

# मिलिंद खळदकर यांना पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** नुकत्याच पालघर जिल्हा येथे महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांनी ५१ व्या महाराष्ट्र राज्य पावरलेटटिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील पालघर, ठाणे, पुणे, मुंबई, मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, अहिल्यानगर इत्यादी १६ जिल्ह्यातील एकूण २८८ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यापैकी ठाणे जिल्ह्यातील कल्याणच्या बालक मंदिर संस्थेच्या कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूल शाळेतील शिक्षक



मिलिंद खळदकर यांनी मास्टर टू (५९) किलो गटात सुवर्णपदक प्राप्त केले. खळदकर यांची दिनांक २ ऑगस्ट ते दिनांक ७ ऑगस्ट रोजी केरळ (कोझिकोडे) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. यासाठी राष्ट्रीय पंच व प्रशिक्षक विनायक कारभारी यांनी मार्गदर्शन केले.

# रायगड जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न तातडीने सोडवा

## - मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांना निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** अखिल महाराष्ट्र सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ रायगड शाखेच्या वतीने जिल्हाध्यक्ष अमरचंद कृष्णाजी पाटील जिल्हा सरचिटणीस गुरुनाथ पाटील जिल्हा कोषाध्यक्ष जगन्नाथ मोकल पेण तालुका अध्यक्ष राजाराम शिवराम गावंड कोषाध्यक्ष प्रदीप बाळाराम म्हात्रे यांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हा संघटनेच्या वतीने देऊन सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न तातडीने सोडवावेत या संदर्भात नुकतीच अलिबाग येथे जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले उपमुख्य वित्त व लेखा अधिकारी तसेच रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांना सेवानिवृत्त शिक्षकांच्या मागण्या तातडीने सोडवण्या बाबत निवेदन दिले.



**सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांची उकल करण्यासाठी शिक्षण अधिकारी तसेच खात्यांचे प्रमुख आणि अखिल रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी यांची एकत्रित बैठक घेऊन लवकरच सर्व प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन दिले.**
**- श्रीम.नेहा भोसले मुख्यकार्यकारी अधिकारी**

या निवेदनात भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदानाचे प्रस्ताव 2023 पासून मंजूर नाहीत ते मंजूर व्हावेत गट विमा 2021 पासून प्रलंबित आहेत, निवड श्रेणी 2014 रोजी 1800 शिक्षकांना मंजूर करण्यात आली पण कार्यवाही दिसत नाही, गेली नऊ वर्ष निवडण्याची माहिती मागवली जात आहे परंतु कार्यवाही शून्य, सेवानिवृत्त शिक्षकांचे 1967 पूर्वीचे व 1 जानेवारी 1968 पासूनच्या सर्व सेवार्थ प्राथमिक शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ द्यावा अन्यथा आंदोलन करण्यास प्रवृत्त करू नका यासह अनेक मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

# आजचे राशिभविष्य



**मेष**
ऑफिसमध्ये काही समस्यांमुळे मूड खराब होऊ शकतो, शक्य तितके सामान्य रहा. कायदा करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन विषयात खूप रस मिळेल.

**वृषभ**
वैवाहिक नात्यात सुरू असलेल्या कलहातून तुम्हाला आराम मिळेल. नात्यात गोडवा येईल. बांधकाम व्यावसायिकांची सुरू असलेली कामे पूर्ण होतील.

**मिथुन**
तुमच्या मुलाकडून तुम्हाला आनंद मिळेल. आरोग्य चांगले राहील. आजूबाजूच्या लोकांशी सौहार्द ठेवा. प्राध्यापकांसाठी दिवस लाभदायक राहील.

**कर्क**
लवकरच पुढे जाण्याची संधी मिळेल. पालक आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करू शकतात. वैवाहिक जीवन आज उत्तम राहील.

**सिंह**
स्पर्धेच्या तयारीत यश मिळेल. सराव सुरू ठेवा. या राशीच्या महिलांसाठी चांगल्या संधी निर्माण होत आहेत ज्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे.

**कन्या**
मसालेयुक्त पदार्थ टाळल्यास आरोग्य चांगले राहील. जोडीदारासोबतचे गैरसमज दूर होतील. आर्थिक स्थिती मजबूत होईल.कामात यश मिळेल.

**तूळ**
गरजेपेक्षा जास्त कोणावरही विश्वास ठेवू नये. आरोग्य चांगले राहील. दिवसभर उत्साही राहाल. हार्डवेअर व्यावसायिकांसाठी दिवस लाभदायक ठरेल.

**वृश्चिक**
तुम्हाला तुमच्या प्रियकराकडून सरप्राईज मिळेल, तुमच्या नात्यात गोडवा वाढेल. विद्यार्थी वर्गमित्रांच्या मदतीने आपली पूर्वीची प्रलंबित कामे पूर्ण करतील.

**धनु**
नोकरीच्या ठिकाणी पुढे जाण्याच्या योजना आज यशस्वी होतील.स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी लक्षापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील.

**मकर**
डोळ्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्यांनी चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. जीवन आनंदाने भरलेले असेल.

**कुंभ**
इतरांना मदत करण्यात रस वाढेल. जर तुम्ही कोणाकडून पैसे घेतले असतील तर तुम्ही ते लवकरच परत कराल. वैवाहिक जीवनात समाधान वाढेल.

**मीन**
तुमच्या वैयक्तिक आयुष्यातील जबाबदारी वाढू शकते.काही काम करण्याची उत्सुकता वाढेल. आज तुमचे आरोग्य चांगले राहील.






# योग दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यात योग सत्रांसह पर्यावरणीय उपक्रमांचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन शनिवार दि. २१ जून, २०२५ रोजी देशभरात साजरा होत असून, या निमित्ताने जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) – २ अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये व्यापक योग सत्रांचे आयोजन केले जाणार आहे. याच बरोबर, ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांच्या सहकार्याने वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा आणि पर्यावरणीय उपक्रम देखील राबविले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) प्रमोद काळे यांनी दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे म्हणाले की, योग दिन २०२५ एक दशकपूर्ती वर्ष असून, यंदाचा योग दिन अधिक वैश्विक आणि एकात्म दृष्टिकोन घेऊन साजरा केला जाणार आहे. यासाठी देशपातळीवर १० विशेष उपक्रम आखण्यात आले असून, त्यात ठाणे जिल्हा ही सक्रिय सहभाग नोंदविणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत २१ जून रोजी सकाळी ६:३० ते ७:४५ या वेळेत देशभरात एकत्रित योग सत्रे आयोजित केली जातील. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत विशाखापट्टणम, आंध्र प्रदेश येथून राष्ट्रीय प्रसारणाद्वारे हा कार्यक्रम पार पडणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमधील योग सत्रे स्थानिक आयुष केंद्रे वा ग्राम आरोग्य समित्यांच्या सहकार्याने घेतली जातील.

हरित योग या विशेष घटकाअंतर्गत, पारंपरिक योगाभ्यासाबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जातील. या उपक्रमांतर्गत ग्रामस्तरावरील पायाभूत सुविधा स्वच्छ करणे, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची स्वच्छता, आणि ग्राम समिती सदस्यांची बैठकीचे आयोजन अपेक्षित आहे.

या वर्षीच्या योग दिनामध्ये WASH – पाणी, स्वच्छता आणि आरोग्य यामधील संबंध अधोरेखित केला जाणार असून, "Yoga for Wellbeing and WASH" या विषयावर विचारमंथन व सत्रांचे आयोजन ग्रामस्तरावर करण्यात येईल.

योग सत्रासाठी विशेषतः जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन टप्पा २ अंतर्गत अस्तित्वात असलेल्या मालमत्तांच्या ठिकाणी कार्यक्रम घेण्यावर भर राहील. सर्व संबंधित ग्राम समित्या, पदाधिकारी आणि ग्रामस्थ यांनी या कार्यक्रमात सक्रीय सहभाग नोंदवून योग दिन अधिक व्यापक व प्रभावीपणे साजरा करावा, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) प्रमोद काळे यांनी केले आहे.

# मा. आयुक्त अनमोल सागर (भाप्रसे) राष्ट्रीयस्तरावर प्राविण्य प्राप्त खेळाडूंना करणार मार्गदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मा. आयुक्त अनमोल सागर (भाप्रसे) हे राज्यस्तर / राष्ट्रीयस्तरावर प्राविण्य मिळविलेल्या भिवंडी शहरातील खेळाडूंकरीता मार्गदर्शन करणार आहेत. त्याचबरोबर श्रीकांत वाड, सचिव महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन आसोसिएशन, डॉ. धनंजय मोरे, क्रीडा आहार तज्या, डॉ. राधिका धारप क्रीडा मानसोपचार तज्ज्ञ, डॉ. शरयू एस क्रीडा फिजियोथेरिपिस्ट हे खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत. सदर मार्गदर्शन शिबिर खेळाडूंसाठी प्रोत्साहन देणे आणि खेळामध्ये प्रगती होण्याकरीता फायदेशीर होणार आहे.

मा. आयुक्त अनमोल सागर (भाप्रसे) श्री. श्रीकांत वाड, डॉ. श्री. धनंजय मोरे, डॉ. श्री. राधिका धारप, डॉ. श्रीमती शरयू एस यांचे अनुभव व मार्गदर्शन हे खेळाडूसाठी एक रणनिती ठरविण्याकरीता एक उपयुक्त दिशा मिळणार आहे.

तरी राज्यस्तर / राष्ट्रीयस्तरावर प्राविण्य प्राप्त खेळाडूंकरीता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत दि.२० जून, २०२५ रोजी स्व.राजय्या गाजेंगी हॉल, कोंबडपाडा, भिवंडी येथे सकाळी १०.०० ते ४.३० वाजेपर्यत होणारे क्रीडा मार्गदर्शन शिबिराकरीता जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# सुविधा नाहीत तर कर नाही

## केडीएमसी आयुक्तांना शंखेश्वर प्रेसिडेन्सी, टावरीपाडा परिसरातील नागरीकांचे निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिसरातील शंखेश्वर प्रेसिडेन्सी,टावरीपाडा परिसरातील नागरिकांनी कल्याण डोंबिवली महानगर पालिका विरोधात एल्गार पुकारत नागरीसुविधा नाही तर कर नाही अशी भूमिका घेतली आहे.

मागील १५ वर्षांपासून प्रलंबित शंकेश्वर प्रेसिडेन्सी, टावरीपाडा -गोदरेज हिल प्रलंबित डि पी रस्ता, कल्याण स्टेशन येथून रिक्षा साठी धावपळ, आरटिओ ते शंखेश्वर प्रेसिडेन्सी टावरीपाडा नागरीकांना चालत पायपीट करावी लागते, सार्वजनिक वाहतूक सुविधेची वानवा, खड्डे पडलेले रस्ते, कल्याण स्टेशन परिसरातील ट्राफिक समस्या अशी दयनीय अवस्था असुन कर वसूल करण्यासाठी बॅनर बाजी करणारी कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाला परिसरातील समस्या दिसत नाही. वारंवार पत्र व्यवहार करून कोणतीही ठोस कार्यवाही नाही व पत्रांना उत्तरही मिळत नाही. नागरीकांनी याबाबत तीव्र नाराजगी व्यक्त करत जोपर्यंत सुविधा मिळत नाही तोपर्यंत कर न भरणाऱ्याचा निर्धार केला आहे. असा ठरावच शंखेश्वर प्रेसिडेन्सी फेडरेशन कमीटीने मंजूर केला असून तसे निवेदन नुकतेच स्फूर्ती फाउंडेशन महिला प्रमुख शिल्पा तांगडकर यांनी सर्व नागरिकांच्या वतीने कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्तांना तथा प्रशासक अभिनव गोयल यांना पत्र दिले असून यावर कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या उत्तराची प्रतिक्षा नागरीक करत आहे.

दरम्यान मागील १५ वर्षात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला शंखेश्वर प्रेसिडेन्सी सोसायटीतील ६५० सदनिका असलेल्या सदस्यांनी अंदाजीत ४ कोटी, ७५ लाख, ५० हजार कर भरला असून याबद्दल्यात काय सुविधा दिली हा प्रश्न नागरीक विचारत आहेत. याबाबत स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या मंत्रालय कार्यालयात पत्रव्यवहार करत हि समस्या मांडली.

# टीओडी मीटर वीज ग्राहकांच्या फायद्याचेच

## कैलास होम्स सोसायटीतील ग्राहकांचे गैरसमज कार्यकारी अभियंत्यांनी केले दूर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील गौरीपाडा येथील कैलास होम्स सोसायटीत टीओडी मीटर बसवताना एजन्सीच्या कर्मचाऱ्याला झालेल्या मारहाणीबाबत खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तर कल्याण पश्चिम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलींद चौधरी यांनी सोसायटीला भेट देत टीओडी मीटरबाबत असलेले वीज ग्राहकांचे गैरसमज दूर केले. टीओडी मीटरपासून ग्राहकांना मिळणाऱ्या फायद्यांबाबत त्यांनी दिलेल्या माहितीवर ग्राहकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

महावितरणतर्फे राज्यभरात अत्याधुनिक असे टीओडी (टाइम ऑफ डे) मीटर लघुदाब वीज ग्राहकांकडे बसवले जात आहेत. महावितरणच्या नव्या वीजदर प्रस्तावात ग्राहकाने वीज कधी वापरली त्या वेळेनुसार दरात सवलत प्रस्तावित आहे. टीओडी मीटर असल्याशिवाय ही सवलत मिळू शकणार नाही. वीज ग्राहकांकडे बसवण्यात येत असलेले मीटर प्रीपेड नव्हे तर पोस्टपेड आहेत. त्यामुळे पहिल्यासारखेच विजेचा वापर केल्यानंतर बिल येणार आहे. आधुनिक मीटर असल्यामुळे अचूक रिडिंग तसेच महावितरण व ग्राहकांना सातत्याने मोबाईलवर विजेचा वापर समजण्यासारख्या नव्या सुविधा यात आहेत. मुख्य म्हणजे महावितरणकडून 'सुधारित वितरण क्षेत्र योजना' या केंद्र सरकार पुरस्कृत योजनेतून ग्राहकांकडे हा मीटर मोफत बसविण्यात येत आहे. महावितरणच्या कल्याण पश्चिम विभागात आतापर्यंत २४ हजार लघुदाब वीज ग्राहकांकडे टीओडी मीटर बसवण्यात आले आहेत, अशी माहिती कार्यकारी अभियंता चौधरी यांनी दिली.

त्यासोबतच वीज नियामक आयोगाच्या तरतुदीप्रमाणे ग्राहकांच्या अचूक वीज बिलासाठी ग्राहकांकडे अत्याधुनिक मीटर बसवणे ही महावितरणची जबाबदारीच नव्हे तर अधिकारही असल्याचे त्यांनी नमूद केले. या कामात आडकाठी ही सरकारी कामात अडथळा ठरेल तसेच ग्राहकांनी कोणत्याही गैरसमजावर विश्वास न ठेवता टीओडी मीटर बसवण्याच्या कामात सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# इंडियन मेडिकल असोसिएशन डोंबिवलीतर्फे 'प्री-हॉस्पिटल ट्रॉमा लाईफ सपोर्ट' प्रशिक्षण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : डोंबिवली मेडिकल फाउंडेशन ऑफ आयएमएच्या अंतर्गत, इंडियन मेडिकल असोसिएशन डोंबिवलीच्या लाईफसेव्हर्स कमिटीने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आणि पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांसाठी, बुधवार १८ जून रोजी डोंबिवली जिमखाना येथे 'प्री-हॉस्पिटल ट्रॉमा लाईफ सपोर्ट' या प्रशिक्षण सत्र पार पडले.या प्रशिक्षण कार्यशाळेत वैद्यकीय तज्ज्ञांची मदत येईपर्यंत अपघातग्रस्त अथवा जखमी रुग्णांना मदत कशी करावी याबाबत डॉ.चंद्रशेखर साठे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी पालिका उपायुक्तप्रसाद बोरकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपा शुक्ल, इंडियन मेडीकल असोसिएशन डॉ. विजय चिंचोले,, डॉ. मंगेश पाटे, डॉ. अर्चना पाटे, डॉ. श्रुती पत्की, नीती उपासनी आदी उपस्थित होते.डॉ. साठे म्हणाले, अपघातग्रस्त रुग्णाच्या जखमेचे मूल्यमापन आणि तीव्रतेची ओळख कशी करावी, ट्रायाजिंग (प्राथमिकतेनुसार रुग्णांचे वर्गीकरण), प्राथमिक उपचार आणि त्यानंतर रुग्णाचे उच्च उपचार केंद्रात सुरक्षित स्थानांतर कसे करावे याची माहिती देण्यात आली.

विविध आपत्कालीन परिस्थितींमध्ये उदाहरणार्थ: रस्ते अपघात, कोसळलेल्या इमारतींमधून वाचवलेले नागरिक, भाजलेले/जळीत रुग्ण, रसायन किंवा किरणोत्सर्गी पदार्थांमुळे प्रभावित झालेले रुग्ण, स्फोटजन्य दुखापती, पडणे, बुडणे, तसेच साप आणि कीटक चावणे यांसारख्या घटनांमध्ये — तज्ज्ञ मदत उपलब्ध होईपर्यंत योग्य कृती कशी करावी हे प्रशिक्षणात सांगण्यात आले.

आपत्कालीन परिस्थितीत लवकर व योग्य हस्तक्षेप केल्यास पुढील दुष्परिणाम टाळता येऊ शकतात. अशा ट्रॉमा रुग्णाला रुग्णालयात पोहोचण्यापूर्वी जर त्वरित व प्रभावी प्राथमिक उपचार मिळाले, तर मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व टाळता येणे शक्य होते.

इंडियन मेडिकल असोसिएशन डोंबिवली सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून कार्यरत असून, नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करणे, समुदायाच्या आरोग्यसेवेत सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम राबवणे आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेसोबत आरोग्यविषयक सकारात्मक उपक्रमांमध्ये सहकार्य करण्यास नेहमीच तत्पर आणि कटिबद्ध आहे असल्याचे डॉ. अर्चना पाटे यांनी यावेळी सांगितले.

# केंद्रीय जीएसटी भिवंडी आयुक्तालय कार्यालयाचा वर्धापनदिन साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : केंद्रीय वस्तू व सेवा कर (जीएसटी)विभाग भिवंडी आयुक्तालय कार्यालयास आठ वर्षे पूर्ण झाल्याने शहरातील अंजूरफाटा येथील गडा महाविद्यालयाच्या सभागृहात करदात्यांना शासन कर प्रणाली बाबतीत मार्गदर्शन करून मोठ्या उत्साहात आठवा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

यावेळी केंद्रीय जीएसटी भिवंडी विभागाचे आयुक्त संजीव कुमार सिंह,अतिरिक्त आयुक्त तारिक मबूद,श्रीमती नैन्सी डिसूजा,उपायुक्त सुनंद झोड़िया,सहायक आयुक्त मानस दाश व सुरेंद्र कविटकर यांच्यासह करदाता नागरिकांसह सी,ए.आणि भिवंडी जीएसटी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयुक्त संजीव कुमार सिंह यांनी गेल्याआठ वर्षात कार्यालयात झालेल्या चांगल्या कामकाज पद्धतीचा आढावा घेत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.कामकाज करताना समोर आलेल्या आव्हानांचा सामना करीत कर्मचाऱ्यांनी चांगले काम केले. भविष्यातसुध्दा पारदर्शक काम करून जीएसटी प्रणालीचे काम प्रभावी पध्दतीने कार्यान्वित करून विकास करण्यासाठी करदात्यांनी सहकार्य करावे असे आवाहन सिंह यांनी यावेळी व्यक्त केले.

उपस्थित चार्टर अकाऊंटट आशुतोष त्रिवेदी व राकेश अग्रवाल यांनी कर प्रशासन व करदात्यां मधील सहयोग मजबूत व अधिक दृढ करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त करीत जीएसटी करप्रणाली अधिक पारदर्शक करणे गरज असल्याचे सांगितले. जीएसटी डिव्हिजन ४ व ५ चे सहाय्यक आयुक्त सुनील प्रसाद व वसंत सोनकुसरे जितेश नाईक, राजेश पमनानी व कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# 'आठवणीतला पाऊस' मध्ये डोंबिवलीकर रसिक चिंब



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : केतकीच्या बनी तिथे, येरे घना येरे घना, भेट तिची माझी स्मरते, घन घन माला नभी दाटल्या, हे सावळ्या घना, अधीर मन झाले, मयुरा रे फुलवीत येरे पिसारा, निशाणा तुला दिसला ना या व अशा विविध भावगीते तसेच चित्रपटांमधील पाऊसगाण्यांच्या सादरीकरणांनी डोंबिवलीकर रसिकांना तृप्त केले. स.वा.जोशी शाळेच्या संकुलात असणाऱ्या ब्लॉसम ऑडिटोरियम मध्ये स्वर गंधार प्रस्तुत आठवणीतला पाऊस या सदाबहार पाऊसगाण्यांचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

संगीत संयोजक उदय चितळे यांना तबल्यावर सुरेख साथ श्रीकांत राईलकर यांनी केली; तर वेंकटेश कुलकर्णी तालवाद्यांचा मेळ उत्कृष्टरित्या साधत ही संगीत मैफिल यादगार केली. सुप्रिया माने, लता काळे, प्रसाद सावंत, ययाती पाठक, जयश्री खोपकर, प्रमोद मेहेंदळे, मिनाक्षी पाटील, संजय सावंत, सुरभी जोशी, अपूर्वा चितळे, विभावरी पाठक, विवेक याकुंडी या मंडळींनी सुरेलरित्या गाणी गाऊन कार्यक्रमात बहार आणली. श्रोत्यांनी गर्दी करुन मैफिलीस चांगला प्रतिसाद दिला.

# शहाड उड्डाण पूल खड्डयांमुळे कल्याण नगर रस्ता बनलाय खोळंबा मार्ग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण मुरबाड नगर या राष्ट्रीय मार्गावरील रेल्वे क्रॉसिंग शहाड पुलाच्या रस्त्यावर पडलेल्या खड्डयामुळे शहाड पूल वाहतूकीच्या वाहनासाठी खोळंबा मार्ग झाला आहे. शहाड उड्डाणपुलावर रस्त्यावर खड्डे पडल्याने याचा फटका वाहतूकीवर होत असून वाहने खड्यातून चालविताना वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत असून वाहन चालकांना वाहतूक कोंडीला सामोरे जाण्याची वेळ येत आहे.



कल्याणहून मुरबाड- नगरकडे जाण्यासाठी असलेल्या मार्गावरील शहाड उड्डाणपूल हा महत्त्वाचा दुवा आहे. येथील रेल्वे लाईनवर हा पूल बांधण्यात आला असून दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरील रस्त्याची अक्षरशः चाळण होते. यंदाही तेच चित्र दिसत असून पुलावरील रस्त्यावर खड्याचे साम्राज्य पाहता संभाव्य अपघाताला निमंत्रण असे दिसून येत आहे आणि या उड्डाणपुलाच्या रस्त्याच्या सुरक्षा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राष्ट्रीय महामार्गाचे ठाणे उपविभागाचे उपअभियंत्यांनी वेळीच पाहणी करून खड्डे प्रश्न मार्गी लावला पाहिजे ,अन्यथा परिणामी पुढील आणखी काही दिवस खड्ड्यांसोबतच वाहतूक कोंडीचाही त्रास नागरिकांना सहन करावा लागणार आहे.तर याबाबत कार्यकारी अभियंता ज्योती शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला तरी फोन घेतला गेला नाही. शहाड उड्डाणपूलावरील रस्त्याचे खड्डे तातडीने बुजवित वाहतूक सुरळीत पणे होईल ही मागणी यानिमित्ताने नागरिक, प्रवासी, वाहनचालक यांच्या कडून जोर धरू पाहत आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

## आता प्रत्येक महिन्यात नागरी आरोग्य केंद्राचा आढावा घेवून

# आरोग्य केंद्राचे गुणांकन करण्यात येणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वैद्यकिय आरोग्य विभाग, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बालकांचे नियमित लसीकरण (Routin Immunization), MR Campain व TB मुक्त अभियान कार्यक्रमांतर्गत CTF सभा मा. प्रशासक तथा आयुक्त, श्री. अनमोल सागर यांचे अध्यक्षतेखाली दि. १७ जून २०२५ रोजी दु. १२.०० वा.



आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेमध्ये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरी आरोग्य केंद्राचा, आरोग्य विषयक निर्देशकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच यापुढे प्रत्येक महिन्यात सर्व नागरी आरोग्य केंद्राचा आढावा घेण्यात येईल व त्यानुसार प्रत्येक आरोग्य केंद्राचे गुणांकन करण्यात येणार आहे. तसेच TB मुक्त भारत अभियान अंतर्गत दररोज ३ ठिकाणी शिबीर आयोजीत करण्यात येत आहे. तरी या शिबीराची व्याप्ती वाढवण्यासाठी शिबीराची जनजागृती करणे आवश्यक आहे असे मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी निर्देश दिले. तसेच लसीकरणाचे प्रमाण वाढण्यासाठी अजुनही नागरीकांमध्ये ज्या काही शंका आहे त्या दुर करण्यासाठी Community Stakeholder व Religious Head यांची एकत्रीत बैठक घेण्याबाबत मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी सुचित केले.सदर CTF सभेकरीता स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाचे प्रतिनिधी व बालरोग तज्ञ, जनसंपर्क अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे प्रतिनिधी, सर्व्हॅलन्स मेडिकल ऑफिसर, सर्व नागरी आरोग्य केद्रातील वैद्यकिय अधिकारी, शिक्षण अधिकारी यांचे प्रतिनिधी, Unicef CSO Partner, CCDT प्रतिनिधी, स्नेहा संस्थेचे अध्यक्ष तसेच वैद्यकिय आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# पद्माकर लहाने यांची ठाणे जिल्हा परिषद बांधकाम विभागात नियुक्ती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / ठाणे : महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्वसाधारण बदली आदेशानुसार पद्माकर लहाने यांची जिल्हा परिषद, ठाणे येथील बांधकाम विभागात कार्यकारी अभियंता या पदावर बदली झाली आहे.

आज, दिनांक १८ जून, २०२५ रोजी लहाने यांनी जिल्हा परिषद, ठाणेच्या बांधकाम विभागात नियमितपणे हजर राहून पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी ते मंत्रालय, मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम विभागात अवर सचिव म्हणून कार्यरत होते. त्यांच्या बदलीने ठाणे जिल्ह्यातील विकासात्मक बांधकाम योजनांना अधिक गती आणि कार्यक्षमतेची जोड मिळेल,



असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी लहाने यांचे स्वागत करत नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कल्याणमध्ये शनिवारी रानभाज्या महोत्सव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सुभेदारवाडा कट्टा आणि कल्याण विकास फाउंडेशनच्या वतीने रानभाज्या महोत्सवाचे आयोजन शनिवार, २१ जूनला करण्यात आले आहे. हा महोत्सव सुभेदार वाडा हायस्कूल, गांधी चौक, कल्याण (प.) येथे दुपारी ४ वाजता होणार आहे. त्यात रानभाज्या प्रदर्शित केल्या जाणार असून, त्यांचे आरोग्यासाठीचे महत्त्व, रेसिपी सांगण्यात येणार आहे. या प्रदर्शनाला अधिकाधिक नागरिक, खवय्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मुरबाड तालुक्यात ३६९ शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(बाळासाहेब भालेराव) :** १६ जून २०२५ रोजी मुरबाड तालुक्यातील सर्व जि.प.शाळा / खाजगी अनुदानित / विनाअनुदानित /शासकीय आश्रमशाळा आणि इंग्रजी माध्यमांच्या सर्व शाळा सन २०२५ – २६ या शैक्षणिक वर्षामध्ये " शाळा प्रारंभ दिन शाळा प्रवेशोत्सव म्हणून शाळा स्तरावर साजरा करण्यात आला. या दिवशी ३२९ जि.प.शाळा,०५ शासकीय आश्रमशाळा व ३५ खाजगी अनुदानित शाळामध्ये इ.१ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना " मोफत पाठयपुस्तके व गणवेश वाटप करण्यांत आले.

तर शाळेच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समिती ,शाळेच्या शिक्षकांमार्फत गुलाब पुष्प देऊन व शाळेतील पहिले पाऊल असे कार्यक्रम साजरे करून स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी शालेय पोषण आहारामध्ये गोड-धोड पदार्थ देवून मुलांचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

या शाळा पूर्वतयारी , शाळा शुभारंभ , शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमावेळी शाळामध्ये शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष / उपाध्यक्ष / समिती सदस्य , पालक , ग्रामपंचायत सरपंच / उपसरपंच / सदस्य इ. उपस्थित होते.तर ह्या दिवशी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , जि.प.ठाणे व मा.शिक्षणाधिकारी प्राथ.जि.प.ठाणे यांच्या १०० दिवस शाळाभेटी कार्यक्रमांतर्गत जिल्हा स्तरावरून केलेल्या नियोजनाप्रमाणे तालुक्यातील शाळांना मा. खासदार महोदय व आमदार महोदय तसेच जिल्हा व तालुका स्तरावरील वर्ग – १ व वर्ग – २ च्या सर्व अधिकाऱ्यानी भेटी देऊन सर्व शाळांना पालक , शिक्षक ,विद्यार्थी , शाळा व्यवस्थापन समिती यांच्याशी संवाद साधून मार्गदर्शन केले , तर भौतिक सुविधा विकासाबाबत मार्गदर्शन करून प्रत्येकी दोन शाळा दत्तक घेऊन वर्षभरामध्ये या शाळांना भेटी देऊन विद्यार्थी गुणवत्ता व लोकसहभाग शाळांच्या भौतिक सुविधा विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे नियोजित आहे.

# डोहोळेपाडा जिल्हा परिषद शाळाप्रवेशोत्सव संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) :** येथील पीएम श्री जिल्हा परिषद शाळा डोहोळे पाडा या शाळेत शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सदर या आयोजित शाळा प्रवेशोत्सात इयत्ता पहिली मधील प्रवेशीय विद्यार्थांना प्रवेशोत्सव रॅली काढून ढोल, लेझीम च्या गजरात वाजत गाजत शाळेपर्यंत आणण्यात आले. शाळेत येताच पहिल्या दिवसाचा आनंद घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या डोक्यात स्वताच्या नावाची आकर्षक टोपी घालून हातात रंगी बेरंगी फुगा घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांना शाळेच्या दाराजवळ उपस्थित पालक महिला, शाळा व्यवस्थापन समिती महिला सदस्यांनी हातात पुष्प देऊन, कुंकम तिलक (औक्षण) करून यथोचित स्वागत करण्यात आले असल्याचे मुख्याध्यापक अशोक गायकवाड यांनी म्हटले. तसेच सर्व उपस्थित विद्यार्थांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करुन मध्यान्ह भोजनांतर्गत शुद्ध शाकाहारी पुलाव व गोड शिरा देऊन शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम गोड करण्यात आला.

## 'विकसित महाराष्ट्र २०४७' साठी

# सर्वेक्षणामध्ये नागरिकांनी मत नोंदवावे


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** 'विकसित महाराष्ट्र 2047' चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी विविध 16 क्षेत्र निहाय नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण करण्यात येणार आहे.नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही. https://wa.link/o93s9m यावर आपले मत नोंदवा, असे आवाहन नियोजन विभागाकडून करण्यात आले आहे.

भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन 2047 पर्यंत विकसित भारत -भारत@2047 करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन 2029 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलर व सन 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र 2047 चे व्हिजन जाहिर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. 6 मे 2025 ते 2 ऑक्टोबर 2025 या कालावधीत 150 दिवसाच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमामध्ये व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. व्हिजन डॉक्युमेंट तयार करताना दीर्घकालीन, मध्यमकालीन व अल्पकालीन अशी टप्पानिहाय उद्दिष्टे ठेवण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. व्हिजन डॉक्युमेंटचा आराखडा तयार करण्यासाठी 16 संकल्पनांवर आधारीत क्षेत्रनिहाय गट बनविण्यात आले आहेत. यामध्ये कृषि, शिक्षण, आरोग्य, ग्राम विकास, नगर विकास, भूसंपदा, जलसंपदा, पायाभूत सुविधा, वित्त, उद्योग, सेवा, सामाजिक विकास, सुरक्षा, सॉफ्ट पॉवर, तंत्रज्ञान व मानव विकास, मनुष्यबळ व्यवस्थापन असे हे क्षेत्रनिहाय गट असतील. या सर्व गटांनी प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन यावर आधारित आराखडा तयार करावयाचा आहे. आराखडा तयार करताना त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, शासकीय/अशासकीय संस्थांशी सल्लामसलत करण्यात येणार आहे.

विकसित महाराष्ट्राच्या व्हिजन मध्ये नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण अभियानाचे उद्घाटन मुख्यमंत्री यांनी दिनांक 17 जून, 2025 रोजी केले आहे. सर्व आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी पासून गावपातळीवरील कार्यालय प्रमुखांनी सर्वेक्षणामध्ये सर्व नागरिकांनी आपले अभिप्राय नोंदवावेत यासाठी दर्शनी भागावर फलक लावावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



आपल्याला परमेश्वराने का जन्माला घातले आहे याचा प्रत्येकाने आपल्या मनाशी अंतर्मुख होऊन शोध घ्यावा व जे आपले विहित कार्य आहे ते प्रामाणिकपणे, निस्वार्थीपणे तन-मन-धनपूर्वक व परमेश्वरार्पण बुद्धीने करणे ही गोष्ट ज्यांना साधली त्याला दैवी जीवन लाभले असे म्हणता येईल.

गुरूमाऊली -प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# ठाणे महापालिका परिमंडळ लोकशाही दिनाचे २१ जुलै रोजी आयोजन

## दि.०७ जुलै २०२५ पूर्वी निवेदन सादर करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** नागरिकांच्या वैयक्तिक तक्रारींचा निपटारा तातडीने होण्यासाठी तालुकास्तरीय लोकशाही दिनाच्या धर्तीवर, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी याप्रमाणे, सोमवार, दि. २१ जुलै रोजी परिमंडळ स्तरावरही लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी १५ दिवस आधी म्हणजेच ०७ जुलैपूर्वी आपली निवेदने सादर करावीत, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपली निवेदने पुढील ठिकाणी सादर करावीत.

परिमंडळ १ - (कळवा, मुंब्रा, दिवा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, कळवा प्रभाग समिती कार्यालय, कळवा

परिमंडळ २ - (नौपाडा, वागळे प्रभाग समिती अंतर्गत,) उपायुक्त कार्यालय, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

परिमंडळ ३ - (उथळसर, वर्तकनगर, लोकमान्य. सावरकरनगर, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

नागरिकांनी प्रथमतः परिमंडळ लोकशाही दिनात अर्ज दाखल करावेत. परिमंडळ लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास नागरिक महापालिका लोकशाही दिनामध्ये नियमानुसार १५ दिवस आधी आपली निवेदने सादर करू शकतील. नागरिकांनी परिमंडळ लोकशाही दिनासाठी आपली निवेदने संबंधित परिमंडळ कार्यालयात सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वृतपत्र लेखन पुरस्कार लीना बल्लाळ यांना प्रदान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : जॉय ऑफ गिविंग संस्थेचा दहावा वर्धापन दिन शनिवार दिनांक ७ जून २०२५ रोजी जोगेश्वरीच्या अस्मिता भवन सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी डॉ एम डी वळंजू, अविनाश दौंड, सत्येंद्र सामंत, डॉ महेश अभ्यंकर, राजेंद्र घरत, रूषीला रिबेलो, जगदीश जायले, आदी मान्यवरांच्या हस्ते ठाण्यातील आघाडीच्या स्तंभ लेखन कराया वृत्तपत्र लेखिका लीना बल्लाळ यांना आदर्श वृत्तपत्र लेखिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शाल, मानचिन्ह, मेडल , सन्मानपत्र यावेळी त्यांना देण्यात आले. श्रीमती लीना बल्लाळ ह्या ठाण्यातील श्रीरंग शिक्षण संस्थेच्या शाळेच्या निवृत्त शिक्षिका असून दैनिक ठाणे वैभव मधून त्या सध्या स्तंभलेखन लेखन करतात. मला आयुष्याच्या दुसया इनिंग मध्ये मिळालेले ? वार्ड हे खरोखरच कौतुकास्पद ठरत आहे असे पुरस्कार मिळाल्यावर बल्लाळ म्हणाल्या आणि मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांनी जॉयचे आभार मानले.

## कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या

# महाराष्ट्र प्रदेश संघटक व ठाणे जिल्हा प्रभारीपदी केतन रोकडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कोरेगाव भीमा विजयस्तंभाच्या अतिक्रमण व मालकी हक्काच्या न्यायालयीन लढ्याला बळ देण्यासाठी आणि राज्यभर जनजागृती करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक व ठाणे जिल्हा प्रभारीपदी कल्याण पूर्वेतील आंबेडकरी चळवळीचे युवा कार्यकर्ते केतन रोकडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीची घोषणा समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी केली.

सरकारकडून वेळोवेळी विकासनिधी जाहीर होत असतानाही अतिक्रमण व मालकी हक्काचा खटला न्यायप्रक्रियेत प्रलंबित असल्यामुळे कोणताही ठोस विकास होऊ शकत नाही. त्यामुळे हा खटला जिंकणे



ही प्राथमिक आणि सामूहिक जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभर – गाव, शहर, तालुका, जिल्हा आणि राष्ट्रीय पातळीवर – जनजागृतीसाठी अभियान राबवण्यात येणार आहे. या न्यायालयीन संघर्षात केतन रोकडे हे गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असून, आंबेडकरी चळवळीतील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. केतन रोकडे हे महाराष्ट्र राज्य वजन माप काटे मंडळाचे माजी अध्यक्ष असून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन समिती (कल्याण पूर्व) चे संस्थापक अध्यक्ष, सार्वजनिक जयंती उत्सव समिती समता फेरी (कल्याण पूर्व) चे माजी अध्यक्ष प्रल्हाद सहादू रोकडे चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे संचालक या आणि अशा विविध सामाजिक- सांस्कृतिक संस्था संघटना मध्ये कार्यरत आहेत .

या निवडी बाबत केतन रोकडे हे कोरेगाव भीमा विजयस्तंभाच्या न्यायालयीन लढ्यात अधिक प्रभावी जनजागृतीसाठी ते तन-मन-धनाने कार्य करतील, असा विश्वास दादाभाऊ अभंग यांनी व्यक्त केला आहे .

# पंढरपुर वारीला सायकलवरुन प्रस्थान

## बहुसंख्य महिलांच्या यात समावेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** एमआयडीसी निवासी मधील गणपती मंदीर पासून आज बुधवारी पहाटे पंढरपुर वारीसाठी पन्नास महिला, पुरुष आणि मुले यांच्या चमू सायकलने रवाना झाला आहे. हे सर्वजण 22 जुन पर्यंत पंढरपुरात वास्तव्य करणार असून तेथे विठोबा माऊलीचे दर्शन घेवून तेथे येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करणार आहेत.

पर्यावरण, आरोग्य, पर्यटन, देवदर्शन असे या सायकल वारीचा उद्देश आहेत. बहुसंख्य महिला असलेल्या या सायकल वारीत 15 वर्षांच्या मुलापासून 78 वर्षाच्या महिला पुरुष पर्यंत समावेश आहे. त्यांच्या सोबत बस, टेम्पो, रुग्णवाहिका असून त्यात पाणी बॉटल, औषधे, खाण्याचे पदार्थ इत्यादी घेतले असून याच्या उपयोग वारकऱ्यांसाठी व सायकल वारीत सहभाग घेतलेल्यांसाठी होणार आहे.

या वारीसाठी काही नागरिकांनी आपली मदत दिली आहे. आज बुधवारी पहाटे वारीला निघण्यापूर्वी भाजपचे महाराष्ट्र राज्य कार्यकारी अध्यक्ष व आमदार रविंद्र चव्हाण आणि कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी या वारीसाठी खास मदत केली असून त्यांनी यावेळी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

# काँग्रेस पक्षाची जिल्हा आढावा बैठक संपन्न

## आगामी निवडणुकीचे अधिकार जिल्हाध्यक्षाना मिळावेत - दयानंद चोरघे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** आगामी महानगरपालिका,पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेऊन ठाणे ग्रामीण काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण भागात पक्ष मजबूत व प्रचार कार्यक्रम सुरू आहे त्यामुळे सर्व कामाचा आढावा घेण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे सचिव तथा कोकणचे प्रभारी यू. बी.वेंकटेश यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी व कार्यकर्तेची विशेष बैठक भिवंडीतील रांजनोली येथील आमंत्रण सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

यावेळी काँग्रेस पक्षाचे कोकण प्रभारी यू.बी.वेंकटेश,ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे,जिल्हा प्रभारी राजेश शर्मा, प्रदेश सरचिटणीस ब्रीज दत्त,ब्लॉक अध्यक्ष कृष्णा रसाळ,संजय जाधव,जितेश विशे,चेतनसिंह पवार,सोमनाथ मिरकुटे, इम्रान शेख,महिला जिल्हाध्यक्ष जान्हवी देशमुख,जिल्हा प्रशासन संघटन प्रमुख महेश धानके, सोहेल खान,संघजा मेश्राम, शरद ठाकरे,सुरेंद्र आढाव, सूर्यकांत भोईर,पंढरी भोईर,अनिता प्रजापती अदि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी झालेल्या मार्गदर्शन बैठकीत काँग्रेस पक्षाचे कोकण प्रभारी यू.बी. वेंकटेश यांनी सांगितले की काँग्रेस पक्ष संकटात असताना अनेकजण पक्ष सोडून गेले मात्र जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी पक्ष मजबूत व पक्षाची ताकद वाढविण्यासाठी जिल्हयात विशेष मेहनत घेतली विरोधकांवर मात करून निवडणूका लढविल्या आहेत ही कौतुकास्पद बाब आहे. पक्षाचे काम न करता प्रदेश कार्यालयात मिरवणारे व निवडणुकीत पक्ष सोडून गेलेल्यांना पदे यापुढे दिली जाणार नाहीत असा इशारा त्यांनी बैठकीत दिला तसेच दयानंद चोरघे यांच्या कार्याचे कौतुक करीत पुढील काळात पक्ष मजबूत करण्यासाठी जिल्हा व ब्लॉक अध्यक्षांना ताकद देण्यासाठी पक्षाचे नेते मदत करतील असे आश्वासन चोरघे यांना दिले.

**लोकसभेचे निवडणुकी काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळाली असती तर काँग्रेस पक्ष कोकण व ठाणे जिल्ह्यात अधिक मजबूत झाला असता असे परखड मत जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघ यांनी व्यक्त करुण त्यांनी सांगितले की आगामी निवडणूका लक्षात घेऊन प्रदेश नेतृत्वाने विश्वास ठेवून सर्व अधिकार जिल्ह्याला दिल्यास आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पक्ष प्रभावी कामगिरी करून यश मिळवेल असा विश्वास चोरघे यांनी व्यक्त केला.या बैठकीस जिल्ह्यातील सर्व ब्लॉकमधून कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते बैठकीचे आभार प्रदर्शन महेश धानके यांनी केले.**

# वरसई कातकरवाडी प्राथमिक शाळेचे नूतनीकरण व उद्घाटन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : शालेय विद्यार्थ्यांना विविध भौतिक सुविधा उपलब्ध असाव्यात त्याचबरोबर शाळेत आलेला विद्यार्थी टिकला पाहिजे शिकला पाहिजे या भविष्याचा विचार करून पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरसई कातकरवाडी येथे शाळा नूतनीकरण व उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला.

नवीन शाळेचे उद्धघाटन डॉ अन्सी जोस मॅडम, नगीनदास खांडवाला महाविद्यालय मुंबई डायरेक्टर, केतू जैन मॅडम अरखाडे बिल्डर्स डायरेक्टर



प्राचार्य मोसमी दत्ता मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत इन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अविनाश घरत गटशिक्षणाधिकारी श्रीम. शर्मिला शेंडे वरिष्ठ विस्तार अधिकारी अरुणादेवी मोरे केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर माजी केंद्रप्रमुख श्रीम.श्वेता म्हात्रे वरसई ग्रामपंचायत सरपंच सदस्य शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रेणूका पवार मुख्याध्यापिका सौ.अलका शिंदे विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शाळा नूतनीकरणासाठी नेल्सन सर, व रणजित लक्ष्मण पवार शिक्षण प्रेमी करंबेली ता.पेण यांचे मोलाचे योगदान लाभले . 500 लोकांना मोफत भोजन देऊन विद्यार्थ्यांना मोफत गणवेश ,मोफत वह्या, व शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले., कार्यक्रम अतिशय उत्साहात झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व पालकांनी विशेष मेहनत घेतली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2025-26



Look forward to a BRIGHTER FUTURE

११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE

| UNDER GRADUATE | POST GRADUATE |
| --- | --- |
| B.A. | M.Sc. CHEMISTRY |
| B.Com. | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY |
| B.Sc. CHEMISTRY | M.A. MARATHI |
| B.Sc. MATHS | M.A. ECONOMICS |
| BAF | M.A. SOCIOLOGY |
| BMS | M.A. HISTORY |

7038658191
9130580111

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | अभ्यासक्रम | कालावधी |
| --- | --- | --- |
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024